नियमित दिवाणी दावा क्र.३८८/२०१९
स्वरुप वि. वैजनाथ

## निशाणी क्र. ५९ वर आदेश.

प्रस्तुतचा अर्ज हा वादी याने त्याचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. प्रस्तूत अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविले. युक्तीवाद ऐकला.

२. वादी याने अर्जात कथन केले की, वादी हा उलटतपासाकामी न्यायालयात उलटतपासाकामी हजर राहू शकले नसल्यामुळे वादी यांच्या विरुध्द 'उलटतपास नाहीचा आदेश' पारीत झाला. आजरोजी वादी उलटतपासाकरीता तयार आहे. त्यामुळे, वादी विरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादींतर्फे वकीलांनी सदर अर्जास म्हणणे देवून विरोध दर्शविला आहे. सबब अर्ज नामंजूर करावा, अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेता, प्रत्येक अर्जात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश :

## आदेश

प्रस्तूत अर्ज रक्कम रुपये ७००/- प्रत्येकी खर्च प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.11.28 17:33:23 +0530

औसा. (श्री. आवटे पी. पी.)

दिनांकः- २८/११/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, औसा